# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### बांद्रे (मुंबई) येथील शासकीय वसाहतीतील अधिकारी,कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठीच्या भुखंडाबाबत

**(१) २८०२ (१७-०७-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) बांद्रे (मुंबई) येथील शासकीय वसाहतीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठीच्या भुखंडाबाबत निकष निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याचे निर्देश मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्देशानुसार किती सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०३-१२-२०२५) :** (१) या विषया संदर्भात तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेण्यात आल्या होत्या. मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १०/११/२०२४ रोजीच्या बैठकी मध्ये समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) शासन निर्णय दिनांक ०१/०७/२०२५ अन्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एकूण १० सदस्यांची समिती गठित करण्यात आलेली आहे. अद्याप, समितीने अहवाल शासनास सादर केलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणीचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याबाबत

**(२) ३८५३ (१०-०७-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील रेड झोन हद्दीचे सॅटेलाइट इमेजद्वारे भूमी अभिलेख विभागामार्फत केलेले सर्वेक्षण पूर्ण होऊन एक वर्ष उलटूनही अंतिम नकाशा तयार न झाल्याने संबंधित काम संथगतीने सुरू असून तळवडे, निगडी, त्रिवेणी नगर, रुपीनगर, यमुना नगर, रावेत, किवळे, चिखली, दिघी, भोसरी, वडमुखवाडी, चऱ्होली, डूडूळगाव व बोपखेल या परिसरांतील नागरिकांवर रेड झोनमुळे कारवाईची भीती कायम असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सर्वेक्षण पूर्ण होऊनही अंतिम नकाशा त्वरीत तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-१२-२०२५) :** (१) व (२) मौजे मोशी, तळवडे, चिखली व किवळे या गावांच्या रेड झोन बाधित सीमेनुसार काही सर्व्हे नंबरचा भाग हा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, हवेली या कार्यालयाच्या अखत्यारीत असून काही सर्व्हे नंबरचा भाग हा नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड या कार्यालयाच्या अखत्यारीत आहे.

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेकडून दिनांक ०६/०९/२०२३ च्या पत्राव्दारे पिंपरी चिंचवड महानगर पालिका विशेष नियोजन प्राधिकरणामध्ये समाविष्ट झालेल्या क्षेत्रामधील व देहू ॲमिनेशन डेपोच्या बाह्य सीमेपासून २००० यार्डात येणारे व दिघी मॅग्झीन डेपोच्या बाह्य सीमेपासून Red Zone क्षेत्राची मोजणी करणेबाबत उप अधीक्षक, भूमि अभिलेख, हवेली व नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड या कार्यालयास पत्र प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने सदर कार्यालयांकडून दिनांक १८/१०/२०२३ रोजी मोजणी फी कळविण्यात आली होती. तद्नंतर पिंपरी चिंचवड, महानगर पालिकेने दिनांक २४/०१/२०२४ रोजी मोजणी फी भरणा केल्यानंतर नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड या कार्यालयाकडून दिनांक २४/०५/२०२४ ते दिनांक २६/०५/२०२४, दिनांक २८/०५/२०२४ व दिनांक २९/०५/२०२४ रोजी मौजे निगडी सह निगडी या महसुली गावात समाविष्ट असलेले रूपी नगर, त्रिवेणी नगर, यमुनानगर, किवळे, चिखली, भोसरी व मोशी येथील मोजणी काम पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, पिंपरी चिंचवड, महानगर पालिकेकडून मौजे डुडूळगाव व बोपखेल या गावांतील रेड झोन बाधित क्षेत्राच्या मोजणीबाबत प्रकरण प्राप्त झालेले नाही.

त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने मौजे वडमुखवाडी व दिघी गावातील रेड झोन बाधित क्षेत्राची मोजणी करण्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून अर्ज सादर केल्यानुसार मार्च, २०२४ मध्ये मोजणी काम करण्यात आलेले आहे. तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, हवेली या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील तळवडे, मामुर्डी, किवळे, रावेत, देहू, माळीनगर, विठ्ठलनगर व किन्हई इ. गावातील रेड झोनने बाधित क्षेत्राची मोजणी करण्यासाठी नियमानुसार मोजणी फी भरण्याबाबत देहू नगरपंचायत व देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड यांना कळविण्यात आलेले आहे. त्यांच्याकडून मोजणी फी भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे दिनांक ०१/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार वर नमूद गावातील रेड झोन बाधित क्षेत्राची दिनांक ०४/०४/२०२५ व दिनांक ०५/०४/२०२५ रोजी मोजणी करण्यात आलेली आहे.

नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड या कार्यालयाकडून दिनांक २५/०४/२०२५ रोजी उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांना "क" प्रत देण्यात आली होती. तथापि, त्यांनी दिनांक २६/०६/२०२५ च्या पत्राव्दारे रेड झोन बाधित मोजणी नकाशामध्ये त्रुटी असल्याचे कळविले होते. तद्नंतर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड या कार्यालयाकडून त्रुटींची पूर्तता करून दिनांक ०१/०८/२०२५ व दिनांक ०९/०९/२०२५ रोजी अहवालासह नकाशे जिल्हाधिकारी, पुणे व उप संचालक, नगर रचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पत्रकारांनी व त्यांच्या विविध संघटनांनी पेन्शन देण्याची मागणी केल्याबाबत

**(३) ४१३० (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुक्त तसेच ई पेपर आणि वेब पोर्टलवर कार्यरत पत्रकारांव आर्थिक संकट ओढावल्याने शासनाने त्यांना दरमहा १० हजार रुपये पेन्शन स्वरूपात देण्याबाबतची मागणी पत्रकार व त्यांच्या विविध संघटनांनी शासनाकडे केली असल्याची बाब माहे मे २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मुक्त पत्रकारांना ५०० ते १००० रुपये मानधन मिळत असल्याने त्यांचा उदरनिर्वाह होत नसून व कर्जबाजारी होत असल्याने त्यांची मानसिक अवस्था खालावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास राज्यात बांधकाम कामगार, घरेलू कामगार,सुशिक्षित बेरोजगारांना व इतर कंत्राटी कामगारांना दिल्या जाणाऱ्या सुविधा पत्रकारांनाही देण्यात येत असताना १० हजार रुपये पेन्शन शासन देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२५) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील मुक्त व ई-पेपर आणि वेब पोर्टलवर कार्यरत पत्रकारांना रुपये १० हजार दरमहा पेन्शन देण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

तथापि, राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना दरमहा आर्थिक सहाय्य मिळावे याकरीता शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०१९ नुसार "आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना" राबविण्यात येते. या योजनेंतर्गत पात्रतेसाठीचे निकष ठरविण्यात आले असून सदर निकषांची पूर्तता करणाऱ्या पात्र ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा "सन्मान निधी" दिला जातो. सदर योजनेंतर्गत ज्येष्ठ पत्रकारांना द्यावयाचे मासिक अर्थसहाय्य रुपये ११,०००/- वरुन रुपये २०,०००/- इतके करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १४ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बारामती जेजुरी जिल्हा मार्गावर बसस्थानक बांधण्याबाबत

**(४) ८६०० (२०-०७-२०२१) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती जेजुरी या जिल्हा मार्ग क्रमांक ६५ वर १४ मोठी गावे असून या गावांसाठी पुरंदर तालुक्यात ११ तर बारामती तालुक्यात २५ बस थांबे आहेत, मात्र या ३६ बसथांब्यांपैकी केवळ सहा ठिकाणी प्रवासी बसस्थानक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे बसस्थानकाअभावी तेथील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण प्रवाशांना ऊन, वारा, पावसापासून बचावासाठी झाडाझुडपांचा व हातातील पिशव्यांचा आधार घेवून एसटी बसची प्रतिक्षा करावी लागत असल्याने याठिकाणी तातडीने बसस्थानके बांधावी, अशी मागणी येथील नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बारामती जेजुरी या जिल्हा मार्गावर बसस्थानक बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१), (२),(३) व (४) बारामती जेजुरी या जिल्हा मार्ग क्र.६५ वर राज्य परिवहन महामंडळाचे एकूण २६ अधिकृत बसथांबे असून, त्यापैकी नेपतवळण, कोराटी (उजवी बाजू) कोराटी (डावी बाजू), जवळा-अर्जुन या चार ठिकाणी प्रवासी मार्गनिवारे आहेत व मोरंगाव येथे महामंडळाचे बसस्थानक आहे.

---

## मुंबई महानगर किनारपट्टीला पुराचा अतितीव्र धोका असल्याबाबत

**(५) ९९९४ (१५-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरच्या नुकत्याच प्रसिध्द झालेल्या पर्यावरणीय संशोधनानुसार सुमारे २० टक्के किनारपट्टीला पुराचा अतितीव्र धोका असल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात स्पष्ट झाले असून जगभरातील ३० हून अधिक पर्यावरण प्रारूपांची तुलना आणि अभ्यास केल्यानंतर आगामी काळात भारतात मान्सूनचा पाऊस अधिक तीव्र स्वरूपाचा असेल असे शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशात सन २०१५ पर्यंत दुष्काळाची चर्चा अधिक असून मागील दोन वर्षात महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, बिहार, आसाम, ओडीसा, पश्चिम बंगालसह पुर्वोत्तर तसेच दक्षिणेकडील राज्यांमध्ये पुरस्थिती निर्माण झाल्याने विपरित हवामानामुळे देशातील व राज्यातील शेतकरी संभ्रमित झाला असून शेती क्षेत्र नष्ट होते की काय अशी भीती शेतकऱ्यांना वाटू लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा -हास होत असल्याने अनियंत्रित जंगलतोड, वृक्ष कटाई, वणवे, जाळपोळ यामुळे नष्ट होणारे वनक्षेत्र, प्रदूषणामुळे वातावरणातील वाढते कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण, कांदळवनातील अनधिकृत अतिक्रमणे आदी सर्व थांबविण्यासाठी शासनाने कोणते धोरण राबविले आहे,

(४) असल्यास, पर्यावरण पुरक वातावरण तयार करण्यासाठी सर्व राज्याची अभ्यास कमिटी नेमून राज्यातील शेती क्षेत्र व मुंबई प्रमाणे समुद्र किनारपट्टीला असणाऱ्या शहरांचे पुरापासून संरक्षण करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शास्त्रज्ञांच्या मदतीने पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-११-२०२५) :** (१) हे खरे नाही. सदर बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही. पूरानंतर आलेल्या राज्याची दुष्काळी परिस्थिती टाळण्यासाठी शासनाने नवीन महाराष्ट्र राज्य जल धोरण २०१९ जाहीर केले. यामध्ये पूर व्यवस्थापन, दुष्काळ निवारण आणि घरगुती तसेच औद्योगिक पाण्याचा वापर यासह इतर क्षेत्रांचा समावेश आहे.
(३) जिल्हाधिकारी व कांदळवन कक्ष यांचे अहवालानुसार कांदळवनातील अनधिकृत अतिक्रमणावर कारवाई केली जाते.
(४) व (५) राज्याच्या सर्वांगीण विकास धोरणात हवामान बदलामुळे उद्धवणाऱ्या जोखमीच्या शक्यतांशी जुळवून घेण्यास सक्षम करण्यसाठी राज्यशासनाने Maharashtra State Adaptation Action Plan on Climate Change तयार केलेला आहे.

---

## तांडा वस्ती सुधार योजनेतील कामे बृहत आराखड्यानुसार करण्याबाबत

**(६) १४१३६ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेची कामे करताना फक्त सिमेंट रस्त्याच्या कामाला मंजुरी देऊन इतर मूलभूत सुविधा उपलब्ध न केल्याने तांडा वस्तीत राहणाऱ्या नागरिकांना अनेक नागरी समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत येत असलेल्या कामांना मंजुरी देताना बृहतआराखड्याचे पालन करणे आवश्यक असताना संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने तांडा वस्ती सुधार योजनेतील कामे बृहत आराखड्यानुसार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१३-११-२०२५) :** (१), (२) व (३) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेतंर्गत तांडा/ वाडी/ वस्तीमधील १.विद्युतीकरण (सोलार पथदिवे /एलईडी बसविणे),२.पिण्याचे पाणी, ३.अंतर्गत रस्ते (सी.सी.रोड/ पेव्हरब्लॉक बसविणे), ४.गटारे, ५.सार्वजनिक शौचालय, ६.समाजमंदिर/वाचनालय, ७.शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणारे पोहोच रस्ते, ८.संत रामराव महाराज सभागृह/समाजमंदिर बांधकाम करणे ही विकास कामे हाती घेण्यात येतात.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेवून विकास कामांचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यात येतो. सदरहू बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या व जिल्हास्तरीय समितीने निवड करून प्रस्तावित केलेल्या कामांनाच योजनेतंर्गत उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार शासनस्तरावरून प्रशासकीय मान्यता व निधी देण्यात येतो.

तांडा/ वाडी/ वस्त्यांचा समतोल विकास व्हावा याकरीता कामांचा प्राधान्यक्रम विचारात घेवून कामे प्रस्तावित करण्याबाबत वेळोवेळी सूचित करण्यात आले आहे. तसेच, दिनांक ३०/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्वसमावेशक कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलिसांच्या पाल्यांना पोलीस भरतीत १० टक्के आरक्षण देण्याच्या मागणीबाबत

**(७) १८८०१ (१९-०६-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस अधिकारी, अंमलदार सेवेत किंवा सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांच्या पाल्यांना पोलीस भरतीत १० टक्के आरक्षण देण्यासह विविध मागण्यासाठी पोलीस बॉइज असोसिएशनने दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास नागपूर विधानभवनावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, तदप्रसंगी वयोमर्यादा ओलांडलेल्या पोलीस पाल्यांना महाराष्ट्र सुरक्षा बल व सुरक्षा रक्षक मंडळात भरती करण्याची मागणी आंदोलकांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी, अंमलदार सेवेत किंवा सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांच्या पाल्यांना पोलीस भरतीत १० टक्के आरक्षण देण्यासह पोलीस पाल्यांच्या इतर विविध मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२५) :** (१) होय.

(२) अशी कोणतीही मागणी अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.

(३) शासन निर्णय दिनांक २२/०८/२०१४ अन्वये अंशकालीन पदवीधरांसाठी लागू असलेल्या १० समांतर आरक्षणापैकी ३ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी पोलीस भरतीमध्ये राखीव ठेवण्यात आले आहे. तसेच सदर ३ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्याचे स्पष्टीकरण शासन पत्र दिनांक २६/०२/२०१६ अन्वये करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पुस्तकांच्या दुय्यम प्रतीची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत

**(८) १९१९५ (०४-०८-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात दुय्यम प्रतींच्या पुस्तकांचा व्यवसाय करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत असून लेखक,प्रकाशक यांच्यासह साहित्य व्यवसायाचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, मराठीतील अभिजात वाड:यीन कलाकृतीच्या दुय्यम प्रती (पायरेटेड) प्रकाशीत करुन त्याचप्रमाणे कॉपीराइट कायद्याचा भंग करुन पुस्तकाची पीडीएफ हस्तांतरीत करणाऱ्या व्यवसायिकांवर कारवाई करण्याचे आश्वासन शासनाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा दुय्यम प्रतीच्या पुस्तक (पायरसी) कृत्य करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे,

राज्यात दुय्यम प्रतीच्या पुस्तकांचा व्यवसाय केल्यामुळे लेखक, प्रकाशक यांच्यासह साहित्य व्यवसायाचे नुकसान होत असल्याचे एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) बेकायदा दुय्यम प्रतीच्या पुस्तक (पायरसी) कृत्य करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे,

१.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रात, अनधिकृतपणे पुस्तकांची छपाई करुन त्यांचा साठा करुन, त्यांची विक्री करुन, स्वामीत्व हक्काच्या कायदयाचे उल्लंघन केले असल्याचे निदर्शनास आल्याने, शिळ डायघर पो.ठाणे, ठाणे शहर येथे गुरनं. १४८/२०२३, प्रतिलिपी अधिकार अधिनियम (कॉपीराईट ॲक्ट) १९५७ चे कलम ५१,५२,६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच गुन्हयात अधिकचा पुरावे गोळा करणेवर गुन्हा तपासावर आहे.

२.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रात चार कंपन्याचे बनावट पुस्तके कोणतेही अधिकार नसताना स्वतःच्या कब्जा बाळगुन नमुद कंपनीच्या स्वामीत्व हक्कांचे उल्लंघन करुन, ते विक्रीस उपलब्ध केले म्हणुन विश्रामबाग पो. ठाणे, पुणे शहर येथे गुरनं ६२/२०२३ कॉपीराईट अधिनियम कलम ५१,६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच यातील आरोपीतास सीआरपीसी ४१(१)(अ) प्रमाणे नोटीसदेण्यात आलेली आहे. तसेच सदरील गुन्हयात मा.न्यायालयात दोषारोपपत्र क्र.१०/२०२३, दिनांक २१/०४/२०२३ रोजी सादर करण्यात आले असून, गुन्हा मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

३.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्रात फुड टेक्नॉलॉजी याविषयावरील पुस्तकाची कॉपी करुन ती पुस्तके त्यांचीच आहेत असे भासवून विविध ग्राहकांना विकली असून त्यामुळे फिर्यादी यांचे कंपनीचे आर्थिक नुकसान झाले म्हणुन सानपाडा पो. ठाणे नवी मुंबई येथे गुरनं. ३९/२०२२, कॉपीराईट ॲक्ट १९५७ चे कलम ६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद गुन्हयात आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, गुन्हा मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

४. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्रात पॉप्युलर पब्लीशर्स आणि डिस्ट्रयुब्युटर प्रा.लि. व व्ही कनेक्ट एज्युकेशन कंपनीचे पुस्तके आरोपींनी स्वतःच्या फायदयाकरीता फिर्यादी यांचे कंपनीने प्रकाशित केलेले मूळ पुस्तकांचे बनावटीकरण करुन विक्री करीता ठेवून ते खरे असल्याचे लोकांना भासवून त्याची विक्री करीत असल्याचे मिळून आल्याने खांदेश्वर पो. ठाणे गुरनं.८९/२०२१ भादंवि कलम ४२०,४६५, प्रतिलिपी अधिकार अधि. १९५७ अधि.१९८४ चे कलम ५१, ६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. उक्त गुन्हयात आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, गुन्हा मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

तसेच, यापुढे ही भाविष्यात पोलीस विभागास अशाच प्रकारच्या तक्रारी वा गुप्तवार्ता मिळाल्यास वेळीच योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## उरण येथील ओ.एन.जी.सी. प्रकल्पातील तेल गळतीमुळे भातशेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(९) २११०७ (०३-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण येथील ओ.एन.जी.सी. प्रकल्पातील क्रूड ऑइल प्रकल्पातील क्रूड ऑईलच्या साठवण टाकीला लागलेल्या गळतीमुळे नाल्यातून क्रूड ऑइल थेट समुद्रात पोहचल्याने किनाऱ्यालगतच्या भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची बाब दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नुकसानीचे पंचनामे शासनाने केले आहेत काय, सदर प्रकरणातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ओ.एन.जी.सी. कंपनीकडून तातडीने नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (२४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे

(२) उरण येथील तेल गळतीमुळे मच्छिमार व शेतकरी नुकसानग्रस्तांचे महसूल विभागाकडून पंचनामे करण्यात आलेले असून ओ.एन.जी.सी. कंपनीकडून प्राप्त रुपये २२,८१,५००/- एवढी रक्कम संबंधित नुकसान ग्रस्त शेतकरी यांच्या बँक खाती धनादेश क्र. ६४९२२८, दिनांक १३/०२/२०२४ अन्वये तहसिलदार उरण यांचेकडून अदा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या समस्या सोडविण्याबाबत

**(१०) २१४१२ (०५-०१-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत चर्मकार समाजातील लोकांना यांचा आर्थिक व सामाजिक तसेच शैक्षणिक विकास होण्यासाठी अनेक विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या समस्या सोडविण्यासाठी संघटनेने मा.सचिव, सामाजिक न्याय यांना निवेदन सादर केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनातील थोडक्यात मागण्या काय आहेत व त्यावर निर्णय घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२१-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

१) कर्जदारांचे कर्ज माफ करण्याबाबत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास कळविण्यात आले आहे.

२) रमाई आवास योजना- १.५ लाख उद्दिष्ट ठरविण्यात आले असून त्यापैकी २५००० घरे मातंग समाजासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

३) इयत्ता १०वी व १२ वी परिक्षेत ९०% पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता (उदा. मेडीकल, इंजिनियरींग इ.) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासनार्फत पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिप योजना राबविण्यात येते.

४) गटई स्टॉलवर करण्यात येणाऱ्या कारवाईच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस गटई कामगारांचे स्टॉल न उचलण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

५) महामंडळ /शासकीय / निमशासकीय/ जिल्हा परिषद/ महानगरपालिका व इतर कार्यालयात अनुसूचित जातीची रिक्त पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाची कार्यवाही सुरु आहे.

६) महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

७) चर्मकार समाजातील पात्र लाभार्थ्यांना विहित अटी व शर्तींनुसार महामंडळाकडून कर्जाचे वाटप करण्यात येते. जामीनदाराबाबतच्या अटी शर्ती शिथिल करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे

८) एनएससीएफडीसी व एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त कर्ज निधीमधून मुदती कर्ज योजना, बीज भांडवल योजना, लघुऋण वित्त योजना, तसेच शैक्षणिक कर्ज योजना इ. योजना राबविण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास रुपये ६०० कोटी, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास रुपये १०० कोटी, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास रुपये ५० कोटी शासन हमीस मुदतवाढ दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे.

९) राज्यातील सव सामाजिक महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता असावी तसेच राज्यातील सर्व संवर्गातील /स्तरातील लाभार्थ्यांना एकच केंद्रीकृत ऑनलाईन व्यासपीठ/पोर्टल असण्याबाबत दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे.

१०) महामंडळाचे उत्पादन केंद्रांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट, विक्री केंद्रांचे नुतनीकरण करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

११) लाभार्थ्यांना कर्ज योजनांचे लाभ सुलभरित्या मिळण्याच्या दृष्टीने ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया महामंडळामार्फत सुरु आहे.

१२) चर्मोद्योगाला चालना मिळण्यासाठी उच्च शिक्षित व MBA च्या विद्यार्थ्यांना उद्योग व व्यवसायाच्या दृष्टीने महामंडळामार्फत मार्केटिंगचे प्रशिक्षण मिळावे म्हणून प्रत्येक सामाजिक न्याय भवन मध्ये क्लासेस सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

१३) महामंडळांतर्गत उत्पादित चर्मवस्तुंना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाच्या मंजूरीनुसार महामंडळाचे अधिकारी /कर्मचाऱी इटली येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी झाले होते.

१४) महामंडळामार्फत 'लिडकॉम आपल्या दारी' या माध्यमातून मेळावे घेवून चर्मकार बांधवांच्या घरोघरी योजना राबविल्या जात आहेत.

१५) चर्मकार समाजाचे उत्थान होण्याच्या दृष्टीने, चर्मकार समाजाच्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद व जनसंपर्क, फॉरिन एज्युकेशन वेबिनार, राष्ट्रीय पातळीवर विविध मेळावे व चर्मवस्तूंचे प्रदर्शन, लेदर क्लस्टर अभ्यास व पाहणी, चर्मकार युवक-युवतींसाठी उद्योजकांच्या कार्यशाळेचे आयोजन, विभाग व जिल्हा पातळीवर आढावा बैठका इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

१६) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वसतिगृहांची सोय, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य इत्यादी सुविधा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नागपूर जिल्ह्यातील मौदा उपविभागीय कार्यालयावर पोलीस पाटील निवड प्रक्रिया अनेक उमेदवारांना डावलल्याबाबत

**(११) २२०१४ (०३-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा उपविभागीय कार्यालयावर पोलीस पाटील निवड प्रक्रियेत अनेक उमेदवारांना डावलल्याप्रकरणी मोर्चा काढून निवेदन दिले असल्याची बाब माहे ऑगस्ट २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस पाटील परीक्षेत मर्जीतील उमेदवारांची निवड करण्यात आल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी उपस्थित करत त्याबाबतचे निवेदन मौदा उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १८/०८/२०२३ रोजी सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, नागपूर यांचे नेतृत्वाखाली उपविभागीय दंडाधिकारी, मौदा कार्यालयास निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मौदा उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर उपविभागातंर्गत पोलीस पाटील पदाच्या उमेदवारांची निवड ही लेखी व मौखिक परीक्षेत प्राप्त गुणवत्तेच्या आधारे करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात विभागीय क्रीडा संकुल येथील नवीन इनडोअर स्टेडियमच्या प्रस्तावाबाबत

**(१२) २२२५२ (०५-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात विभागीय क्रीडा संकुल येथील नवीन इनडोअर स्टेडियमकरीता यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागील जागा प्रस्तावित करून त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास अमरावती येथील आढावा बैठकीत निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला असल्यास या प्रस्तावाला मंजुरी देण्याचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू प्रस्ताव शासनाकडे मान्यतेकरीता प्रलंबित असल्यास त्यास मान्यता देण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय असून याबाबत शासन सकारात्मक असल्यास याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत करणार आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०१-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विभागीय उपसंचालक, क्रीडा विभाग, अमरावती यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागे असलेली खुली जागा विभागीय क्रीडा संकुल उभारण्याकरीता करीता क्रीडा विभागास कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्याबाबत विनंती केली आहे. सदर जागा अद्याप क्रीडा विभागाच्या नावे झालेली नाही. जागा प्राप्त झाल्यावर शासन निर्णय दिनांक २३ मार्च २०२२ अनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(१३) २२९४८ (२२-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक २१५१३ ला दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर शिक्षकांनाही १०-२०-३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शासकीय व निमशासकीय कर्मचारी व शिक्षक समन्वय समितीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ महाविद्यालयीन व कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून सुधारित आश्वासित प्रगती योजना पूर्वलक्ष प्रभावाने लागू करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यानी मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे, सदर मागणीच्या पूर्ततेसाठी शिक्षक संघटनांनी आंदोलनाद्वारे वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा केला आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बक्षी समितीने १००% अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कार्यान्वित करण्यात यावी, अशी शिफारस केली असून शिक्षकांबाबत कोणतीही शिफारस केली नसल्याने सदर योजना शिक्षकांना लागू करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालाच्या आधारे अनुदानित खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठीची टिप्पणी वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०२४ ऐवजी दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून पूर्वलक्ष प्रभावाने तसेच वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर केलेल्या टिप्पणीच्या अनुषांगाने आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२८-११-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे. राज्यातील खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २ लााभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यातबाबतचा शासन निर्णय दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) राज्यातील खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २ लााभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आलेली होती. तथापि, सदर योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही तसेच कोणतीही थकबाकी देय होणार नाही असे अभिप्राय वित्त विभागाने दिलेले असून त्यास मा.मुख्यमंत्री यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच, राज्यातील शिक्षकांना १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबतची नस्ती वित्त विभागास सादर केली असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात आले आहेत. "केंद्र शासनाने प्राध्यापक डी.पी. चटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शिक्षकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार (चटोपाध्याय आयोगानुसार) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या

तसेच खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना शासन निर्णय दिनांक २ सप्टेंबर १९८९ अन्वये दिनांक १ जानेवारी १९८६ पासून केंद्र शासनाच्या धर्तीवर त्रिस्तरीय वेतनरचना विविध संवर्गात मूळ श्रेणी, वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी लागू करण्यात आली असून ती आजतागायत सुरू आहे. सेवा तीन कार्यासनाने दिलेल्या अभिप्राय पाहता व त्या अनुषंगाने विभागाने सादर केलेला खुलासा पाहता अद्याप केंद्रामध्ये शिक्षकांना अशा प्रकारची योजना लागू केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणामध्ये राज्य शासनाने बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही"

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या बनावट सही व बनावट शिक्का असलेली निवेदने निदर्शनास आल्याबाबत

**(१४) २३१३७ (१४-०८-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २२१५२ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नावाची बनावट सही व शिक्का असलेली काही निवेदने माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही राज्याच्या मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खाजगी सचिवांच्या नावे बनावट ई-मेल तयार करुन त्याद्वारे विद्युत विभागाशी संबंधित सहा अभियंत्यांच्या बनावट बदलीचे आदेश विद्युत विभागाला पाठविले त्यावर मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नावाच्या बनावट सह्या असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मंत्री महोदयांच्या नावाचा गैरवापर करणारी टोळी मंत्रालयात सक्रिय आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा बनावट सह्या व शिक्क्यांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्याचे मा.मुख्यमंत्री यांची बनावट सही व शिक्का असलेली काही निवेदने प्राप्त झाल्याची बाब दिनांक २८/०२/२०२४ रोजी उघडकीस आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या खाजगी सचिवांच्या नावे बनावट ईमेलद्वारे मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस महोदयांच्या नावाच्या बनावट सह्या असलेले बदलीबाबतचे कोणतेही आदेश महानिर्मिती कंपनीस प्राप्त झालेले नाहीत. तसेच अशा प्रकारची तक्रार मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे प्राप्त झालेली नाही.

(४) राज्याचे मा.मुख्यमंत्री यांची बनावट सही व शिक्का असलेली काही निवेदने प्राप्त झाल्याची बाब दिनांक २८/०२/२०२४ रोजी उघडकीस आली असून याबाबत मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, बृहन्मुंबई येथे दिनांक २८/०२/२०२४ रोजी गु.र.क्र. ३९/२०२४ मध्ये भादंवि कलम ४२०, ४६५, ४६८,४७१,४७३ अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयातील आरोपी मिळून आल्यास अथवा त्याचा शोध लागल्यास सदरचा गुन्हा पुन्हा तपासावर घेवून आरोपीविरुध्द योग्य ती कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. सदरचा गुन्हा "खरा परंतु शोध न लागलेला" असा "अ" वर्गीकरण समरी मंजुरीसाठी गुन्हयाचे कागदपत्रे दिनांक १६/०५/२०२५ रोजी मा.अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, ८ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला असून त्याचा कोर्ट केस क्र. १९०५/एम.आय.एस.सी/२०२५ असा आहे.)
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई म्हाडातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) २३६२८ (२२-०७-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई म्हाडातील इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळातील एकूण पदांपैकी २७ टक्के पदे रिक्त असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे सेस इमारतींच्या पुनर्विकासाची कामे प्रलंबित अाहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-१०-२०२५) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही, सद्य:स्थितीत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात कार्यरत असलेल्या तांत्रिक तसेच अतांत्रिक कर्मचाऱ्यांकडून कामाचा निपटारा करण्यात येत असल्यामुळे उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाची कामे प्रलंबित नसल्याची बाब मुंबई इमारत व दुरूस्ती पुनर्रचना मंडळाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत विविध मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही प्राधिकरणस्तरावर सुरू आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय तसेच निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत निर्णय घेतला आहे. त्यानुसार मंडळामार्फत जाहिरात देऊन विवक्षित कामांसाठी पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्याची कार्यवाही सुध्दा इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्यात येत असल्याचे त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विशेषत: पेण, पनवेल व खोपोली (जि.रायगड) येथे बंद असलेल्या दूध डेअरी व दूध संघ पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१६) २४०९४ (०८-०८-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली दूध डेअरी (जि.रायगड) गेल्या वर्षभरापासून बंद असल्याने ही दूध डेरी आता कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मार्च २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील १३४ दूध संस्थांसह इतर दोन दूध संस्थांचे केंद्रही मागील काही महिन्यापासून बंद झाले असून पनवेल व पेण तालुक्यातील दोन जिल्हा दूध संघ दिवाळखोरीत निघाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे का

(३) असल्यास, राज्यभरातील दूध डेअऱ्या व दूध संघ पुन्हा चालू करण्याच्या दृष्टीने शासन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०१-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

कोकण विभागामधील रायगड जिल्ह्यातील प्राथमिक दूध उत्पादक सहकारी संस्थांनी शासकीय दूध योजना, खोपोलीस दूध पुरवठा बंद केल्याने दिनांक ०१/०१/२०२३ पासून शासकीय दूध योजना, खोपोलीचे दूध संकलन व वितरणाचे कामकाज बंद झालेले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये माहे मार्च २०२३ अखेर १८ संस्था कार्यरत असून, ११८ संस्था अवसायनात आहेत. तसेच रायगड जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ मर्या., पेण व पनवेल तालुका दूध उत्पादक सहकारी संस्था संघ मर्या. रोहींजन, ता.पनवेल हे २ दूध संघ सन २०१३ पासून अपुऱ्या दूध संकलनामुळे अवसायनात आहेत.

(३) दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी शासनामार्फत राज्यातील दूध संघांना राष्ट्रीय कृषी विकास योजना (राकृवियो), राष्ट्रीय दुग्धविकास कार्यक्रम यांसारख्या केंद्रपुरस्कृत योजनांमार्फत अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच शासन वेळोवेळी बाजारात हस्तक्षेप करुन दुग्धव्यवसायाला अनुदान स्वरुपात मदत करत असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण किनारपट्टीवर वास्तव्य करणाऱ्या मच्छीमार आणि इतर समाजाच्या गावाचे नकाशेच नसल्याने नागरिकांचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

**(१७) २४११० (१६-०७-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदललेल्या सीआर झेड निकषाने कोकण किनारपट्टीवर वास्तव्य करणाऱ्या मच्छीमार आणि इतर समाजाच्या गावाचे नकाशेच नसल्याने येथील नागरिकांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास मागील २५ वर्षापासून गाव नकाशाची ग्रामस्थांना प्रतीक्षा असून कोकण किनारपट्टीवरील सात जिल्ह्यातील गावांचे नाव नकाशेच अस्तित्वात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यास्तव बहुसंख्य पारंपारिक मच्छीमारांची परवड होऊ नये याकरीता राज्यातील सात जिल्ह्यातील कोस्टल झोन क्षेत्रात गाव नकाशे तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

कोकण विभागातील किनारपट्टीवरील तसेच खाडीलगत असलेल्या तालुक्यातील गावांचे गाव नकाशे संबंधित तालुक्यातील भूमि अभिलेख कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.
(२) व (३) कोकण विभागातील किनारपट्टीवरील तसेच खाडीलगत असलेल्या तालुक्यांतील, तसेच जिल्ह्यातील इतर सर्वच तालुक्यांतील गावांचे गाव नकाशे अस्तित्वात असून ते संबंधित तालुक्यांमधील भूमि अभिलेख कार्यालयामध्ये उपलव्ध आहेत. तसेच सदरचे गाव नकाशे भूनक्शा पोर्टलवर नागरीकांसाठी https://mahabhunakasha.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर नागरीकांसाठी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे नागरीकांच्या मागणी प्रमाणे/नक्कल अर्जाप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाकडून नकाशे उपलब्ध करून देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वाढत्या वाहनांमुळे होणारे प्रदूषण व वाहतूक कोंडी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१८) २४१२९ (१६-०७-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर आरटीओ कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) गत वर्षभरात मुंबईतील ४ आरटीओ कार्यालयात २.५४ लाख वाहनांची नोंदणी झालेली असून मुंबईतील एकूण वाहनांची संख्या सुमारे ४६ लाखांपर्यंत गेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एका कुटुंबाचा २ ते ३ वाहने खरेदी करण्याकडे कल असून या वाढत्या वाहन संख्येमुळे वाहतूक कोंडीचे प्रमाणही वाढले असून दिवसेंदिवस हवा आणि ध्वनी प्रदूषणात वाढ होऊन याचा विपरित परिणाम मानवी आरोग्यावर होण्याचा धोका संभवत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने मुंबईकरांना ठराविक अंतर पार करण्यासाठी निश्चित वेळेपेक्षा सुमारे ७५ टक्क्याहून अधिक वेळ लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि मुंबईत वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता होत असलेली वाहतूक कोंडी व पर्यावरण हानी रोखण्याकरीता तसेच प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने वाहनांची नियमित तपासणी करण्याबाबत तसेच मुंबईतील वाहनांची संख्या नियंत्रणात आणण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१६-०७-२०२५) :** (१) नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील ४ प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहन पोर्टलवरील नोंद असणाऱ्या वाहनांची संख्या ३८,५३,०७० इतकी आहे.
(३), (४) व (५) राज्यातील अंदाजे ६० टक्के वाहने ही दुचाकी वाहने आहेत.

राज्यात वायुवेग पथकांमार्फत पी.यु.सी प्रमाणपत्र न बाळगणाऱ्या तसेच प्रदूषण करणाऱ्या वाहनांविरुध्द नियमित कारवाई करण्यात येते.

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई शहराच्या दहिसर नाका, आनंद नगर नाका, मुलूंड (जुना) नाका, ऐरोली नाका व मानखुर्द नाका या ५ जकात नाक्यांवर वायु प्रदूषण करणाऱ्या वाहनांबाबत विशेष तपासणी मोहीम नोंव्हेबर-२०२३ पासून सुरु असून २४ तास वाहन तपासणी केली जाते. तसेच वायु प्रदूषण व ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते.

रस्त्यांवरील वाहनांची संख्या कमी रहावी व टॅक्सी/रिक्षांचा पर्याप्त क्षमतेने वापर होण्यासाठी शहरात विविध मार्गावर शेअर-ए-टॅक्सी/रिक्षा सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे.

वाहतूक कोंडीबाबत सार्वजनिक प्रवासी सेवांचा जास्तीत जास्त वापर वाढविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) द्वारे मेट्रो रेल्वे यासारखे पायाभूत प्रकल्प उभारण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदूस (ता.खेड जि.पुणे) येथील बेघर लोकांना वास्तव्यासाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनीची मोजणी करण्यास विलंब झाल्याबाबत

**(१९) २४३८८ (२९-११-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदूस (ता.खेड जि.पुणे) येथील ५ हजार बेघर अनुसूचित जातीच्या कुटुंबांना शासन आदेशानुसार प्रत्येकी एक गुंठा याप्रमाणे देण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या मोजणीसाठी दिनांक १४ सप्टेंबर,२०२२ रोजी आवश्यक शुल्क अदा करूनही जमिनीची मोजणी न करता केवळ मोजणीच्या तारखा देण्यात आल्या असल्याचे माहे ऑगस्ट,२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन आदेशानुसार गट नंबरप्रमाणे जागेची मोजणी करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त शासकीय जमिनीची गट नंबरप्रमाणे मोजणी करून ताब्यात देण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच मोजणी करण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०२५) :** (१), (२) व (३) श्री.दिपक ताटे यांच्या विनंतीनुसार तहसिलदार, खेड यांनी त्यांचे पत्र दिनांक २६/०५/२०२२ अन्वये मौजे चांदुस, ता.खेड, जि.पुणे येथील सर्व्हे ग.नं. १४२, ४७४ व ५९१ या मिळकतींच्या मोजणीबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खेड यांना कळविले होते. त्यानुसार श्री.दिपक ताटे यांनी दिनांक १४/०९/२०२२ रोजी मोजणी फी भरणा केल्यानंतर उपअधीक्षक भूमि अभिलेख, खेड कार्यालयाने सदर या मिळकतींच्या मोजणीसाठी मो.र.नं. ३४६३/२०२२, ३४६४/२०२२ व ३४६५/२०२२ अन्वये दिनांक २७/१२/२०२२ ते दिनांक २९/१२/२०२२, हा कालावधी दिला होता.

तथापि, सदर प्रकरणी अर्जदार यांच्या विनंतीनुसार दिनांक २८/०३/२०२३ ते दिनांक ३०/०३/२०२३, हा सुधारित कालावधी मोजणीसाठी देण्यात आला होता.

तद्नंतर तहसिलदार, खेड यांनी त्यांचे पत्र दिनांक २७/०३/२०२३ अन्वये विषयांकित जमीन ही मुळची "गायरान" संवर्गातील असलेने व सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता असल्याचे दिसून येत नसल्याने विषयांकित गटाची मोजणी प्रक्रिया रद्द करण्यात यावी, असे नमूद करून मोजणी रद्द करणेबाबत उप अधीक्षक भूमि अभिलेख, खेड यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अर्हताप्राप्त कला शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देय ठरविणेबाबत

**(२०) २४४५१ (०५-०३-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील माध्यमिक शाळेच्या इयत्ता ६ वी ते ८ वी गटातील पदवीधर वेतनश्रेणीस पात्र कला शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याची पूर्वापार तरतूद आजही कायम आहे काय,
(२) असल्यास, अनुदानित माध्यमिक शाळेतील किती कार्यरत पूर्ण अहर्ताधारी कला पदवीधरांना (ए.एम.) अजूनपर्यंत पदवीधर वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली नाही काय,
(३) असल्यास, आर टी ई मधील तरतूदी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील कला, क्रिडा आणि कार्यानुभव विषयांना प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेऊन या विषयांच्या शिक्षकांना विशेष शिक्षकांचा दर्जा अधोरेखित करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, कला शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शालेय शिक्षण विभाग शासन अधिसूचना दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ नुसार,कृषी पदवीधर व बी.टी. किंवा बी.एड, पदवीधर बी.टी. किंवा बी.एड, पदवीधर व २ वर्षांची डीप.टी. पदविका, पदवीधर अध्यापन किंवा शिक्षणशास्त्र पदविकेसह किंवा डी.पी.एड. (नागपूर विद्यापीठ) किंवा टी.डी. (मुंबई विद्यापीठ) यांना देय असलेली मूळ श्रेणी (एस १४), वरिष्ठ श्रेणी (एस १५) व निवडश्रेणी (एस-१७) ही वेतनश्रेणी जी. डी. आर्ट किंवा बी. एफ. ए. (ए.टी. डी. किंवा आर्ट मास्टर प्रमाणपत्र किंवा पदविका कला शिक्षण शास्त्र पदवीका) किंवा जी.डी. आर्ट किंवा बी.एफ.ए. यांना लागू करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.